# प्रकरण सहावे

## सारांश, निष्कर्ष व शिफारशी

६.० प्रस्तावना

६.१ सारांश

६.२ निष्कर्ष

६.३ शिफारशी

६.४ प्रस्तुत संशोधनाची संबंधीत पुढील संशोधनासाठी क्षेत्रे व विषय

# प्रकरण: सहावे

# सारांश,निष्कर्ष व शिफारशी

## ६.० प्रस्तावना :

शिक्षण प्रक्रिया ही विद्यार्थ्यांच्या अध्यनास चालना देणारी प्रक्रिया आहे.विद्यार्थ्यांचे अध्ययन जास्त परिणामकारक होण्यासाठी विविध अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने,इतर भैतिक सुविधा काम करत असतात. शिक्षणात नवीन तंत्रविज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.आजची शिक्षण पध्दतीत माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. अध्यापनास पूरक नवीन शैक्षणिक तंत्रज्ञान कार्यरत आहे. प्रसार माध्यामातील माहितीच्या आधारे विद्यार्थी ज्ञान आत्मसात करतात.व या ज्ञानाचा उपयोग शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी केला जातो.

अध्ययन चांगले परिणामकारक होण्यासाठी मानसशास्त्रीय व तत्वाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो या वैयक्तिक एक अभ्यास सवयी चांगल्या अभ्यास सवयी ह्या चांगले अध्ययन होण्यासाठी उपकारक ठरत आहे. चांगल्या अभ्यास सवयीमुळे मुले योग्य रीतीने अभ्यास करतात. युक्ती काढतात, चांगल्या प्रकारे स्मरणात ठेवतात या मुळे शैक्षणिक संपादन चांगल्या प्रकारे प्राप्त करतात.

प्रसार माध्यमाच्या ज्ञानाचा आणि चांगल्या अभ्यास सवयीचा शैक्षणिक संपादणूक वाढवण्यास मदत होईल.

## ६.१ सारांश

प्रसार माध्यामाशी संपर्क आणि अभ्यास सवयी यांचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादनाशी संबंध -एक अभ्यास हे संशोधन शिवाजी विद्यापीठाशी सलग्नित कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांशी संबंधित आहे संशोधकाने छात्राध्यापकाचा प्रसार माध्यांमाशी येणारा संपर्क आणि अभ्यास सवयी यांचा शैक्षणिक

संवादनाशी संबंध अभ्यासला आहे.

**संशोधन समस्येचे शब्दांकन :**

प्रसार माध्यांमाशी संपर्क आणि अभ्यास सवयी यांचा छात्राध्यापकाच्या शैक्षणिक संपादनाशी संबंध -एक अभ्यास

**संशोधताची उद्दिष्ट्ये :**

१ छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीप्रमाणे वर्गवारी करणं.

२ छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यागांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

३ छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यनांवरील प्रसारीत कार्यक्रमांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

४ छात्राध्यापकांनी वृत्तपत्रे या प्रसार माध्यमांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकाचा शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

५ छात्राध्यापकांनी वृत्तपत्रे या प्रसार माध्यमातील विशेष बातमी वाचण्याकरीता दिलेल्या वेळेचे आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

६.छात्राध्यापकांना मासिक या प्रसार माध्यमासाठी दिलेल्या वेळेचे आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

७.छात्राध्यापकांनी मासिक या प्रसार माध्यमातील विविध लेख वाचण्यासाठी दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

८.छात्राध्यापकानी अभ्यास सवयीना दिलेल्या वेळेचा आणि शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

९. छात्राध्यापकांनी विविध क्लृप्त्या,गृहपाठ,वाचन,परीक्षेसाठी दिलेला वेळ व शैक्षणिक संपादणूकीचा शोध घेणे.

१०. प्रसार माध्यमांचा व चांगल्या अभ्यास सवयीचा उपयोग करून शैक्षणिक संपादणूक क्षमता वाढवण्यासाठीचे उपाय सुचीवणे.

## संशोधनाची गृहितके :

१)छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यात दूरचित्रवाणीतरील कार्यक्रम पाहण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

२)छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यात वर्तमान पत्रातील विशेष बातमी वाचण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

३)छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यात मासिकातील विविध लेख वाचण्याच्या आवडी वेगवेगळ्या असतात.

४)छात्राध्यापक प्रसार माध्यमांतून कमी अधिक ज्ञान ग्रहण करतात.

५)प्रत्येक छात्राध्यापक प्राविण्य मिळविण्यासाठी अभ्यास करतो.

६) प्रत्येक छात्राध्यापकाच्या अभ्यास सवयी वेगळ्या असतात.

## परिकल्पना :

१. प्रसार माध्यमाचा संपर्क यांचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीशी संबंध असतो.

२. अभ्यास सवयींचा छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीशी संबंध असतो.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधना करीता संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून शिवाजी विद्यापीठाशी सलग्नित असणाऱ्या कोल्हापूर जिल्हयातील काही शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकाचा प्रसार माध्यामाशी संपर्क आणि अभ्यास सवयी यांच्या छात्राध्यापकाच्या शैक्षणिक संवादनाशी संबंध अभ्यासला.

## सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने :

प्रस्तुत संशोधनात सामग्री गोळा करण्यासाठी संशोधकानी पुढील साधनाचा वापर केला. १)प्रसार माध्यामाशी संपर्क प्रश्नावली ( संशोधकाव्दारा प्रश्नावलीची रचना करून शिक्षणाशास्त्र महाविद्यालयात पडताळलेली आहे.) २)अभ्यास सवयी प्रश्नावली (एम. :न. पडसाने यांनी तयार केलेली प्रश्नावली उपयोगात आणली गेली.)

**नमुना निवड:–** कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकाची निवड केली. त्याचे विश्लेषण पुढे पाहू.

**कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालये**

| शहरी | ग्रामीण |
|---|---|
| दोन महाविद्यालये | तीन महाविद्यालये |
| (१६० छात्राध्यापक) | (२४० छात्राध्यापक) |
| (१००%) | (१००%) |

**आधार सामग्रीचे विश्लेषण :**

प्रस्तुत संशोधनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकाकडून जी प्रश्नावली भरून घेतली त्या भरलेल्या सामग्रीचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

**१. प्रसार माध्यामाशी संपर्क प्रश्नावली :**

छात्राध्यापकाचा प्रसार माध्यमाशी येणाऱ्या संपर्कांचा शोध घेण्यासाठी या प्रश्नावलीचा वापर करण्यात आला या मध्ये दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे आणि मासिक या प्रसार माध्यमांचा समावेश होतो.

**दूरचित्रवाणी** -दूरचित्रवणीवरील कार्यक्रमासाठी छात्राध्यापका द्‌वारा दिला जाणारा वेळ व कार्यक्रम याचा शोध घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्नांचा वापर केला.

**वृत्तपत्रे**–वृत्तपत्रे या प्रसार माध्यमांना दिलेल्या वेळेचा शोध घेण्यासाठी प्रश्तावलीतील वृत्तपत्रे यासाठी दूसरा विभाग करण्यात आला.

**मासिक**–मासिक या प्रसार माध्यमातील लेखाशी छात्राध्यापकाच्या येणाऱ्या संबंधाचा शोध घेण्यासाठी प्रश्नावलीतील तिसरा भाग करण्यात आला.दूरचित्रवाणी या प्रसार माध्यामावरील माहिती घेण्यासाठी तीन मुख्य प्रश्न आणि पर्याय दिले. पर्यायाना १,२,३,४ मुल्य दिले आणि विश्लेषण केले.वृत्तपत्रे या प्रसार माध्यामासाठी तीन मुख्य प्रश्न आणि पर्याय दिले.त्यानाही १,२,३,४ मुल्य देवून विश्लेषण केले. मासिक या प्रसार माध्यमासाठी तीन प्रश्न आणि पर्याय दिले. प्रसार माध्यम प्रश्नावलीत एकूण पाच प्रश्न आणि प्रत्येक प्रश्नांना उपप्रश्न देवून पर्याय दिले. तसेच आठवड्यातून चार वेळा, आठवड्यातून दोन वेळा,कधी कधी ही नाही असे पर्याय दिले प्रत्येकाना एक ,दोन,तीन,चार मुल्यांकन दिले व त्या माहितीचे विश्लेषण केले.

**२. अभ्यास सवयी प्रश्नावली**

अभ्यास सवयी प्रश्नावली म. न. पलसाने यानी तयार केलेल्या प्रश्नावलीचा वापर केला. या प्रश्नावलीत एकूण ४५ प्रश्न आहेत.या प्रत्येक प्रश्नाला तीन पर्याय होते.'अ'नेहमी किंवा बहुदा 'ब' कधी कधी 'क' क्वचित किंवा कधीच नाही या पर्यायाचे मुल्यांकन काढण्यासाठी 'अ'पर्यायाला २ 'ब' पर्यायाला १ 'क' पर्यायाला ० मुल्याकंन दिले. नकारार्थी प्रश्नाला 'अ'पर्यायाला ० 'ब'पर्यायाला १ आणि 'क'पर्यायाला २ मुल्याकंन दिले एकूण ४५ प्रश्नापैकी ११ प्रश्न नकारार्थी आहेत.

## आधार सामग्री गोळा करण्याकरीता वापरलेली पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान परिस्थितीशी संबंधित असलेले सर्वेक्षण पध्दतीचा

उपयोग केला गेला आहे. सामग्री एकत्रित करण्याकरीता खालील साधनाचा (Tools) उपयोग केलेला आहे.

१) प्रसार माध्यमाशी संपर्क प्रश्नावली (संशोधकाद्वारा प्रश्नावलीची रचना करून विश्वसनीयता पडताळलेली आहे.)

२) अभ्यास सवयी प्रश्नावली (म. न. पलसाने)

प्रस्तुत संशोधनाकरीता आधार सामग्रीचे विश्लेषण करण्याकरीता खालील सांख्यिकीय तंत्राच्या सहाय्याने केले गेले आहे.

१) टक्केवारी (

## ६.२ निष्कर्ष :

**छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमाना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकी संबंध निष्कर्ष :**

१. दूरचित्रवाणी पहाणा या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवता जास्त आहे. दूरचित्रवाणी कमी पहाणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवता कमी आहे. जास्त वेळा दूरचित्रवाणी पहाणारे छात्राध्यापक आणि शैक्षणिक गुणवत्ता १०० व १००% च्या जवळपास आहे. यावरून दूरचित्रवाणी साठी जास्त वेळ देणे याचा संबंध उच्च शैक्षणिक संपादणूक प्राप्त करण्याशी आहे.

**छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकी संबंधी निष्कर्ष**

१.सिनेमा आणि सिनेमा संबंधित कार्यक्रम जास्त पहाणाऱ्या आणि मध्यम पहाणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुली यांची शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ किंवा निम्न आहे. तर हा कार्यक्रम कमी किंवा क्वचित पहाणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च किंवा मध्यम आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात दूरचित्रवाणी वरील सिनेमा व सिनेमाशी संबंधित कार्यक्रम पहाणाऱ्या प्रमाणात विशेष फरक नाही.

२.उच्च शैक्षणिक संपादन करणारे आणि मध्यम शैक्षणिक संपादन करणाऱ्या छात्राध्यापकांचा मालिका या कार्यक्रमाशी संपर्काचे प्रमाण उच्च आहे. तुलनेत निम्न आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांचे प्रमाण कमी आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांची तुलना केल्यास जास्त वेळ दूरचित्रवाणीवरील मालिका पाहण्यात विशेष फरक नाही. मध्यम वेळ दूरचित्रवाणीवरील मालिका पहाण्याचे प्रमाण मुलींचे जास्त आहे. क्वचित वेळ मूल मालिका पहातात.

३.उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक निम्न व कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांच्या तुलनेत जाहिराती कमी वेळा किंवा क्वचित वेळा पहातात.एकूण छात्राध्यापकांचे जाहिराती पहाण्याचे प्रमाण कमी किंवा क्वचित आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांची तुलना केल्यास दूरचित्रवाणीतील जाहिराती पहाण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

४.उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे विद्यार्थी माहितीपट जास्त प्रमाणात तुलनेत कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण छात्राध्यापकांचे माहितीपट पहाण्याचे प्रमाण कमी आहे. मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापकांचे माहितीपट पहाण्याचे प्रमाण जास्त आहे. छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांची तुलना केल्यास दूरचित्रवाणीतील माहितीपट पहाण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

५.उच्च शैक्षणिक संपादन करणारे छात्राध्यापक मुले आणि मुली बातमी बातम्यांशी संबंधित कार्यक्रम पहाण्यासाठी जास्त वेळ देतात. मध्यम शैक्षणिक संपादन करणारे मुले आणि मुली हा कार्यक्रम पहाण्यासाठी मध्यम वेळ देतात. निम्न आणि कनिष्ठ शैक्षणिक

संपादन करणारे छात्राध्यापक मुले आणि तुलनेत कमी वेळ बातमी व बातम्यांशी संबंधित कार्यक्रम पहातात.

६.उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापकांचे खेळाशी संबंधित घटना पहाण्याचे प्रमाण जास्त आहे. मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात खेळाशी संबंधित घटना पहाण्याचे प्रमाण मध्यम आहे. कनिष्ठ शैक्षणिक संपादणूक धारण करणारे छात्राध्यापक क्वचित वेळा खेळाशी संबंधित घटना पहातात. कनिष्ठ शैक्षणिक संपादणूक धारण करणारे छात्राध्यापक जास्त मुली क्वचित वेळा खेळाशी संबंधित घटना पहातात.

७.जे छात्राध्यापक मनोरंजनात्मक खेळ आणि स्पर्धात्मक कार्यक्रम जास्त वेळा पहातात. त्यांनी शैक्षणिक संपादन उच्च प्रतीचे मिळवले. मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक आणि निम्न शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक हा कार्यक्रम मध्यम वेळा पहाण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुले छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत जास्त वेळ प्रस्तुत मनोरंजनात्मक खेळ व स्पर्धात्मक कार्यक्रम पहाण्यासाठी देतात.

८.कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक इतर शैक्षणिक संपादणूक धारण करणाऱ्या छात्राध्यापकांच्या तुलनेत जास्त वेळा अन्य कार्यक्रम पहातात. छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्या तुलनेत छात्राध्यापक मुले दूरचित्रवाणी वरील अन्य कार्यक्रम जास्त वेळा पहाण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात अन्य कार्यक्रम पहाण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

**छात्राध्यापकांनी वृत्तपत्र या प्रस ार माध्यामांना दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूक संबंधी निष्कर्ष :**

१.वर्तमान पत्र वाचणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक संपादणूक क्षमता जास्त असलेली दिसून येते. जास्त वेळ वर्तमान पत्र वाचणारे छात्राध्यापक उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करतात याचा अर्थ वर्तमान पत्राच्या माध्यामाचा उच्च शैक्षणिक संपादणूक प्राप्त करण्यासाठी उपयोग होतो.जे छात्राध्यापक कनिष्ठ शैक्षणिक संपादणूकीत आहे,ते जास्त वेळ वर्तमान पत्र वाचण्यासाठी देत नाहीत. किंवा क्वचित प्रसंगी ते वर्तमान पत्र वाचतात यावरून वर्तमान पत्राच्या संपर्कात छात्राध्यापक न आल्याने शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ शैक्षणिक संपादन मिळाले तर जास्त वर्तमान पत्राच्या संपर्कात येणाऱ्या छात्राध्यापकांना उच्च शैक्षणिक संपादणूक प्राप्त करता आली.

**छात्राध्यापकांनी वृत्तपत्रे या प्रसार माध्यमातील विशेष बातमी वाचण्याकरीता दिलेल्या वेळेचे आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकी संबंधी निष्कर्ष.**

**निष्कर्ष :**

१.जे छात्राध्यापक जास्त आणि मध्यम वेळा वर्तमान पत्रातील फक्त शिर्षक वाचतात. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. जे छात्राध्यापक कमी वेळा आणि क्वचित वेळा वर्तमान पत्रातील फक्त शिर्षक वाचतात. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण निम्न आणि कनिष्ठ श्रेणीची आहे.

छात्राध्यापक मुलांच्या तुलनेत छात्राध्यापक मुलीचे वर्तमान पत्रातील शिर्षक वाचण्याचे प्रमाण कमी आहे.

२.ज्या छात्राध्यापकांचे मासिकातील मुख्य बातम्या वाचण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यांना उच्च व मध्यम शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त झाली निम्न आणि कनिष्ठ गुणवत्ता असणारे

छात्राध्यापक मासिकातील मुख्य बातम्या वाचण्याचे प्रमाण कमी आणि क्वचित मध्ये जास्त आहे. जास्त मुख्य बातमी वाचण्याचे प्रमाण मुलींचे आहे.

३.उच्च आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक निम्न आणि कनिष्ठ गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकच्या तुलनेत वर्तमान पत्रातील प्रादेशिक बातम्या वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत छात्राध्यापक मुले जास्त वेळ प्रादेशिक बातमी वाचतात.कमी किंवा क्वचित वाचण्याचे प्रमाण मुलांच्या तुलनेत मुलीमध्ये आहे.

४.जे छात्राध्यापक वर्तमान पत्रातील जागतिक बातम्या जास्त प्रमाणात वाचतात त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च अणि मध्यम आहे. जे छात्राध्यापक वर्तमान पत्रातील जागतीक बातम्या कमी किंवा क्वचित वाचतात. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता निम्न आणि कनिष्ठ आहे.

छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत छात्राध्यापक मुलांचे मासिकातील जागतिक बातमी वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुले जागतिक बातम्या छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत जास्त वेळा वाचन करतात.

५.उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे तसेच मध्यम आणि निम्न शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापकाचे वर्तमान पत्रातील खेळाविषयक लेख वाचण्याचे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या तुलनेत अधिक आहे.

छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत छात्राध्यापक मुले वर्तमान पत्रातील खेळविषयक लेख जास्त प्रमाणात वाचतात.

६.उच्च आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक निम्न आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या तुलनेत कमी वेळा वर्तमानपत्रातील जाहिराती वाचतात हे निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या

छात्राध्यापकाचे जाहिरात वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात जाहिराती वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

७.वर्तमान पत्रातील विक्री परीक्षण तसेच गंमतीदार मालिका वाचण्याचे प्रमाण उच्च आणि मध्यम शैक्षणिक संपादणूक प्राप्त करणाऱ्या छात्राध्यापकांचे जास्त आहे.

छात्राध्यापक मुलांचे प्रमाण छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत विक्री, परीक्षण व गंमतीदार मालिका वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

८.वर्तमान पत्रातील संपादकीय लेख वाचण्याचे प्रमाण उच्च शैक्षणिक संपादणूक प्राप्त करणाऱ्या छात्राध्यापकांचे जास्त आहे. उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या तुलनेत निम्म शैक्षणिक गुणवत्ता आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांचे प्रमाण कमी आणि क्वचित आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात वर्तमानपत्रातील संपादकीय लेख वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

९.वर्तमान पत्रातील अन्य लेख वाचण्याचे प्रमाण उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात जास्त आहे. मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक मध्यम वेळा जास्त प्रमाणात आहे. वर्तमान पत्रातील अन्य लेख वाचण्याचे कमी आणि क्वचित प्रमाण कनिष्ठ गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक जास्त आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात वर्तमान पत्रातील अन्य लेख वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

**छात्राध्यापकांनी मासिक या प्रसार माध्यमासाठी दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकी संबंधी निष्कर्ष.**

१.मासिक वाचणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता जास्त आहे. मासिक

वाचण्यासाठी जे छात्राध्यापक मुले आणि मुली जास्त वेळ देतात त्यांची शैक्षणिक संपादणूक उच्च आहे. मध्यम शैक्षणिक संपादणूक मध्येही जास्त आणि मध्यम मासिक वाचण्यासाठी वेळ देणाच्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे. निम्म शैक्षणिक गुणवत्ता आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करणारे छात्राध्यापक मासिक वाचण्यासाठी कमी वेळ देतात.

**छात्राध्यपकांनी मासिक या प्रकार माध्यमातील विविध लेख वाचण्यासाठी दिलेल्या वेळेचा आणि छात्राध्यापकांच्या शैक्षणिक संपादणूकीसंबंधी निष्कर्ष.**

१.मासिकातील लघुकथा जास्त प्रमाणात वाचणाऱ्या छात्राध्यपकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आहे. मध्यम वेळ मासिकातील लघुकथा वाचणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. उच्च आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्तेच्या तुलनेत निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता असणारे छात्राध्यापक कमी किंवा क्वचित वेळा मासिकातील लघुकथा वाचतात.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्या मासिकातील लघु कथा वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

२.मासिकातील मुलाख़ती जास्त आणि मध्यम वेळा वाचण्याच्या छात्राध्यापकांना उच्च आणि मध्यम शैक्षणिक संपादन प्राप्त केले. मासिकातील लेख कमी व क्वचित वेळा वाचणाऱ्या छात्राध्यापकाचे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक संपादणूक प्राप्त करणारे छात्राध्यापक मासिकातील मुलाखती कमी व क्वचित वेळा वाचतात.

छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत छात्राध्यापक मुले मासिकातील मुलाख़ती जास्त प्रमाणात वाचतात.

३. उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक मुलींचे मासिकातील महिला विषयक लेख वाचण्याचे प्रमाण जास्त आहे. कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या

छात्राध्यापकांचे महिलाविषयक लेख वाचण्याचे प्रमाण क्वचित आहे.

छात्राध्यापक मुलांच्या तुलनेत छात्राध्यापक मुली मासिकातील महिलाविषयक लेख जास्त वाचतात.

४. छात्राध्यापक मुलींच्या तुलनेत छात्राध्यापक मुलांचे राजकीय लेख वाचण्याचे प्रमाण जास्त आहे. उच्च शैक्षणिक गुणवत्ता आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक राजकीय लेख निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांच्या तुलनेत जास्त वाचतात.

५. मासिकातील संपादकीय लेख वाचण्याचे प्रमाण उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात अधिक प्रमाणात आहे. निम्म शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात मासिकातील संपादकीय लेख वाचण्याचे प्रमाण अल्प म्हणजेच कमी किंवा क्वचित वेळा वाचतात.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात मासिकातील संपादकीय लेख वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

६. उच्च शैक्षणिक गुणवत्ता आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या तुलनेत कमी वेळा किंवा क्वचित वेळा मासिकातील जाहिराती पहातात. निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापकांचे मासिकातील जाहिराती वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुली यांच्यात मासिकातील जाहिराती वाचण्याच्या प्रमाणात विशेष फरक नाही.

७. उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांचे मध्यम, निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या तुलनेत मासिकातील विनोद आणि गमतीदार चित्रपट्टी वाचण्याचे प्रमाण अधिक आहे.

छात्राध्यापक मुलांच्या तुलनेत छात्राध्यापक मुलींचे मासिकातील विनोद किंवा गंमतीदार चित्रपट्टी वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

८ मध्यम आणि निम्म शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांचे कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकांच्या तुलनेत मासिकातील अन्य लेख वाचण्याचे प्रमाण जास्त आहे.

[illegible]

**निष्कर्ष : छात्राध्यापकांच्या अभ्यास सवयीसाठी दिलेल्या वेळेसंबंधी निष्कर्ष**

१. नेहमी जे छात्राध्यापक मुले आणि मुली अभ्यास सवयीसाठी जास्त वेळ देतात. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता क्वचित वेळ कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक अभ्यास सवयींना वेळ देतात.

**निष्कर्ष :**

२. नेहमी जे छात्राध्यापक ठराविक वेळी अभ्यासाला वेळ देतात। त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. कधी कधी जे छात्राध्यापक अभ्यासाला ठराविक वेळ देतात त्यांची निम्न शैक्षणिक गुणवत्ता आहे. क्वचित वेळ कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक ठराविक वेळ अभ्यासाला देतात.

**निष्कर्ष :**

**छात्राध्यापकांच्या गृहपाठासंबंधी अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक या संबंधित निष्कर्ष.**

१. नेहमी गृहपाठ करणारे छात्राध्यापक मुले आणि मुलींची उच्च शैक्षणिक गुणवत्ता आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण जास्त आहे. नेहमी गृहपाठ न करणारे छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुलींना निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण केलेली आहे.

नेहमी गृहपाठ करणारे छात्राध्यापक उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करतात.

२. नेहमी भवितव्याच्या दृष्टीने अभ्यासाचे महत्व जाणून घेणारी अभ्यास सवयी असणारे छात्राध्यापक मुले आणि मुलींचे उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारण करण्याचे प्रमाण जास्त आहे. कधी कधी आणि क्वचित भवितव्याच्या दृष्टीने अभ्यासाचे महत्व जाणून घेणारे छात्राध्यापकांना निम्न आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त झाली.

नेहमी भवितव्याच्या दृष्टीने अभ्यास केल्यामुळे उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त होते.

३. वाचताना नेहमी टिपणे उतरून घेणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुलींचे उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण सर्वात जास्त आहे. नेहमी वाचताना टिपणे उतरून घेणारे छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. कधी कधी आणि क्वचित वाचताना टिपणे उतरून घेण्याचे प्रमाण असणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ आहे.

४. नेहमी वाचताना काय वाचले हे आठवण्याचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण उच्च आणि मध्यममध्ये जास्त आहे. कधी कधी वाचताना काय वाचले हे आठवणाचा छात्राध्याकांची शैक्षणिक गुणवत्ता निम्न आहे. क्वचित वेळा वाचताना काय वाचले हे आठवण्याचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ आहे.

५. नेहमी घरी आल्यावर टिपणे एकत्र करणे या अभ्यास सवयी असणाऱ्या उच्च शैक्षणिक संपादणूक असणाऱ्या छात्राध्यापक मुलां पेक्षा छात्राध्यापक मुलींचे प्रमाण जास्त आहे. कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करण्याचा छात्राध्यापक मुलांना क्वचित प्रसंगी घरी आल्यावर टिपणे एकत्र करतात.

६. नेहमी परीक्षेनंतर कांही गोष्टी चुकल्यात का हे पहाणाऱ्या छात्राध्यापकांचे प्रमाण उच्च आणि मध्यम शैक्षणिक गुणवत्ता जास्त प्रमाणात धारण करतात. निम्न आणि कनिष्ठ

शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक मुले आणि मुली परीक्षेनंतर कांही गोष्टी चुकल्यात का हे पहाण्याचे प्रमाण अल्प आहे.

७. नेहमी अभ्यास सवयीत सुधारणा करण्याच्या छात्राध्यापक मुले आणि छात्राध्यापक मुलींची शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण उच्च आणि मध्यम मध्ये जास्त आहे. कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करण्याच्या छात्राध्यापक मुले आणि मुलींचे घरी आल्यावर अभ्यास सवयीत सुधारणा करण्याचे प्रमाण अल्प आहे.

**निष्कर्ष :**

१.छात्राध्यापकांव्दारा अभ्यास करताना वेगवेगळ्या क्लृपयांच्या वापराविषयी अभ्यास सवयी आणि शैक्षणिक गुणवत्ता संबंधित निष्कर्ष.

नेहमी आणि कधी कधी प्रकरण वाचण्यापूर्वी सारांश वाचनाचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण उच्च मध्यम आणि निम्ममध्ये जास्त आहे. क्वचित वेळा प्रकरण वाचण्यापूर्वी सारांश वाचण्याचे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक जास्त आहे.

२. नेहमी आणि कधी कधी मुद्दा समजण्यासाठी काळजीपूर्वक वाचन करणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. हे प्रमाण निम्म आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुलीमध्ये अल्प आहे.

३. वाचताना पुटपुट करणे या अभ्यास सवयी असण्याचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च, मध्यम आणि निम्ममध्ये जास्त आहे. हे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात क्वचित वेळा यामध्ये जास्त आहे.

४. नेहमी साहित्याचे भाग पाडून पाठांतर करण्याचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता प्रमाण उच्च मध्य जास्त आहे. मध्यम शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक मुलां पेक्षा मुलींचे प्रमाण नेहमीमध्ये जास्त आहे. नेहमी साहित्याचे भाग पाडून पाठांतर करण्याचा

अभ्यास सवयीत कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करण्याऱ्या छात्राध्यापकात हे प्रमाण अल्प आहे.

५. नेहमी न समजल्यास पाठांतर न करण्याचे प्रमाण असणारे छात्राध्यापक मुले आणि मुलींची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. निम्न आणि कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करण्याऱ्या छात्राध्यापकात हे प्रमाण अल्प आहे.

६. नेहमी आणि कधी कधी अभ्यासाची वारंवार उजळणी करणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम मध्ये जास्त आहे. क्वचित वेळा कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणारे छात्राध्यापक मुले आणि मुली अभ्यासाची वारंवार उजळणी करतात.

**निष्कर्ष :**

## छात्राध्यापकांव्दारा परीक्षेची तयारी करण्यांसाठी असणाऱ्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक संबंधित निष्कर्ष.

१. नेहमी सुरूवातीला प्रश्न पत्रिका वाचण्याचा छात्राध्यापकांचे उच्च शैक्षणिक गुणवत्तामध्ये हे प्रमाण जास्त आहे. क्वचित वेळा सुरूवातीला प्रश्नपत्रिका वाचण्याचे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक गुणवता धारण करणाऱ्या छात्राध्यापकात आहे.

२. नेहमी क्रमाने उत्तरे लिहणारे छात्राध्यापक मुले आणि मुलांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि माध्यममध्ये जास्त आहे. हे प्रमाण कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करण्याच्या छात्राध्यापकात अल्प आहे.

३. नेहमी वेळेची विभागणी करणाच्या छात्राध्यापक मुले आणि मुलींची शैक्षणिक गुणवत्ता उच्च, मध्यम आणि निम्न आहे. क्वचित वेळा वेळेचे विभागणी करणारे छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ आहे.

४. नेहमी उत्तराची कच्ची रूपरेषा तयार करण्याचा छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. हे प्रमाण निम्न शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक

कधी कधी आणि क्वचितमध्ये जास्त आहे. कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुली क्वचित वेळा उत्तराची कच्ची रूपरेषा तयार करतात.

५. नेहमी चाचणींच्या निकालांची योग्य दखल घेणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुलींची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. हे प्रमाण क्वचित वेळा कनिष्ठ शैक्षणिक गुणवत्ता धारण करणाऱ्या छात्राध्यापक मुले आणि मुलींत आहे.

६. नेहमी निकालावरून कच्चे विषय शोधणाऱ्या छात्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. कधी कधी आणि क्वचित वेळा निकालावरून कच्चे विषय शोधणारे छात्राध्यापक निम्न आणि शैक्षणिक गुणवत्तामध्ये जास्त आहे.

७. नेहमी कच्चे विषय सुधारण्याचा प्रयत्न करणारे छात्राध्यापक मुले आणि मुलींची शैक्षणिक गुणवत्ता उच्च आणि मध्यम आहे. क्वचित वेळा कच्चे विषय सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या छात्राध्यपकांची शैक्षणिक गुणवत्ता कनिष्ठ आहे.

**उद्दिष्ट क्रमांक १०:** प्रसार माध्यमांचा व चांगल्या अभ्यास सवयीचा उपयोग करून शैक्षणिक संपादणूक क्षमता वाढवण्यासाठीचे उपाय सुचविणे.

## ६.३ शिफारशी :

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये प्रसार माध्यम प्रश्नावली व अभ्यास सवयी प्रश्नावली (म. न. पलसाने) व्दारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे काही निष्कर्ष पाहिले. त्या निष्कर्षावर आधारित काही शिफारशी खालील प्रमाणे करता येतील.

### दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमा संदर्भात छात्राध्यापकांसाठी काही शिफारशी

१. छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी वर प्रसारित होणाऱ्या मालिकांची माहिती घेवून त्यातील अर्थबोध प्राप्त करून देणाऱ्या मालिका पाहाव्यात.

२. छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणीवरील योग्य माहिती प्रसारीत करणारे माहितीपट पहावेत.

३. छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणी वर प्रसारित होणाऱ्या बातम्या व बातम्या संबंधीचे कार्यक्रम नियमितपणे पाहावेत याचा उपयोग आपल्याला ज्ञानात्मक माहितीमध्ये भर घालण्याकरिता करावा.

४. छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणीवर प्रसारित होणारे खेळाविषयक कार्यक्रमही पहावेत.

५. मनोरंजनाच्या माध्यमातून ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने तसेच स्पर्धात्मक युगात स्थैर्य प्राप्त करण्याच्या हेतुने तसेच बुध्दिला विचार करायला लावण्याच्या हेतुने छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणीवरील गमतीदार खेळ व स्पर्धाविषयक कार्यक्रम पहावेत.

६. आपल्या बुध्दिला सर्वांगिण विचार करायला लावण्याच्या दृष्टिने छात्राध्यापकांनी दूरचित्रवाणीवर प्रसारित होणारे इतर कार्यक्रम ही पहावेत व अन्य व्यक्तिबरोबर त्याविषयी चर्चा करावी. चांगल्या बाबी अन्य व्यक्तींच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

**वर्तमानपत्र या प्रसार माध्यमा सदंर्भात छात्राध्यापकासाठी शिफारसी :**

१. छात्राध्यापकांनी राजकीय, सामाजिक,धार्मिक, आर्थिक घडामोडी जाणून घेण्याकरीता प्रत्येक दिवशी वर्तमान पत्र वाचावे.

२. छात्राध्यापकांनी वर्तमान पत्रातील शिर्षके ही अधिकाधिक वाचण्याचा प्रयत्न करावा.

३. छात्राध्यापकांनी वर्तमानपत्रातील मुख्य बातम्याचे नियमितपणे वाचन करावे.

४. छात्राध्यापकांनी प्रदेश विषयक माहिती प्राप्त करण्याकरीता प्रादेशिक बातम्या वाचनाकडेही लक्ष द्यावे

५. छात्राध्यापकांनी जगातील घडामोडी जाणून घेण्याकरीता जागतिक घडामोडीचे वाचन करावे.

६. छात्राध्यापकांनी खेळाविषयक बातम्यांचे नियमिनपणे वाचन करावे.

७. छात्राध्यापकांनी वर्तमान पत्रातील जाहिरातीचे नियमिनपणे वाचन करावे.

८. छात्राध्यापकांनी आठवड्यातून नियमित दिवशी प्रसारीत होणाऱ्या अन्य लेखांचे त्या त्या दिवशी वाचन करावे.

**मासिक या प्रसार माध्यमां संदर्भात छात्राध्यापकांसाठी शिफारसी:-**

१. छात्राध्यापकांनी मासिकांचे (शिक्षणविषयक) वाचन नियमितपणे इतर दिवशी ही करावे.

२. छात्राध्यापकांनी इतर दिवशीही मासिके वाचनासाठी वेळ अधिक द्यावा.

३. छात्राध्यापकांनी मासिकातील खेळाविषयी लेखांचे वाचन इतर दिवशी ही करावे.

४. छात्राध्यापकांनी मासिकातील मुलाखंतीचे वाचन मुलाखतीविषयीची माहिती अधिकाधिक मिळविण्याकरीता करावी.

५. छात्राध्यापक मुले विशेषत: मुलीनी मासिकातील महिला विषयींच्या लेखांचे वाचन करावे त्यात प्रसारीत होणाऱ्या महिलांच्या समस्या जाणून घ्याव्यात. त्यामध्ये जर उपाय सुचविले गेले असतील तर त्याचा विचार करावा.

६. छात्राध्यापकांनी मासिकातील आपल्या तसेच अन्य देशातील राजकीय घडामोडीचे ज्ञान प्राप्त करण्याकरीता राजकीय वैशिष्ट्यांचे वाचन अन्य दिवशी ही करावे.

७. छात्राध्यापकांनी मासिकातील संपादकीय लेखाचे वाचन इतर दिवशी ही करावे.

८. छात्राध्यापकांनी सामाजिक, राजकीय जाहिरात विषयक ज्ञानाबरोबर मासिकातील विनोदाचे ही वाचन करावे.

९. छात्राध्यापकांनी मासिकातील अन्य लेखाचे वाचन स्वत:च्या सामान्य ज्ञानामध्ये भर घालण्याचा दृष्टिकोनातून करावे.

**नियमितपणे अभ्यास सवयी संदर्भात छात्राध्यापकांसाठी शिफारसी :**

१. छात्राध्यापकांने नियमितपणे व सखोलतेने अभ्यास करावा.

२. छात्राध्यापकांने महाविद्यालयीन वेळ व उपलब्ध वेळ यांचा मेळ घालून नियमित अभ्यासाची सवय लावून घेण्याकरीता अभ्यासाची वेळ निश्चित करावी.

**अभ्यास करताना वेगवेगळ्या क्लृप्त्यांचा वापर करण्यासंदर्भात छात्राध्यापकांसाठी शिफारसी :**

१. छात्राध्यापकांने एखादे प्रकरण अभ्यासल्यानंतर प्रत्येक मुद्दयाचे काळजीपूर्वक वाचन करून त्याचा सारांश मुद्देसुद पणे तयार करावा. त्या मुद्दांच्या आद्य अक्षरांचा एक निश्चित क्रम तयार करावा व तो क्रम लक्षात ठेवावा. व त्या प्रत्येक आद्य अक्षरापासून कोणता शब्द तयार होतो ते ही लक्षात ठेवावे.

उदा: आकाशातील इंद्रधनुष्याचे रंग लक्षात ठेवण्याची क्लृप्ति ता - तांबडा

२. छात्राध्यापकांने एखादे प्रकरण अवघड वाटल्यास त्याचे खंडश: पध्दतीने वाचन करून नंतर समग्र लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करावा.


३. छात्राध्यापकांने वाचन असताना स्मरणात ठेवण्याच्या दृष्टिने मौनवाचन करावे.

४. छात्राध्यापकांने स्वताची किंवा विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षेचा वगैरे विचार केला किंवा पाठ घेत असताना शब्द उच्चारणाच्या जेथे प्रश्न उद्‌भवणार असतो अशावेळी त्या त्या पाठ्यांशाचे वाचन मोठ्याने करावे.

५. छात्राध्यापकाने संपूर्ण पाठ्याश समजला नाही किंवा पाठ्याशातील काही भाग जर समजला नाही तर पुन्हा पुन्हा मार्गदर्शकाकडून तो समजावून घ्यावा व नंतर पाठांतर करावा.

६. छात्राध्यापकांने झालेल्या अभ्याच्या दृढिकरणा करीता, स्मरणात ठेवण्याकरिता उजळणी करावी.

७. मुद्यांचा क्रम आकृतिच्या साहय्याने ही स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावा.




अनुभवाचा शंकु

**परीक्षेची तयारी करण्यासंबंधित अभ्याससवयी विषयी छात्राध्यापकांसाठी शिफारसी :**

१. परीक्षेची तयारी करण्याकरीता छात्राध्यापकांने प्रश्नपत्रिका सुरूवातीला काळजीपूर्वक वाचली पाहिजे.

२. छात्राध्यापकांने प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्न दिर्घोत्तरी, लघुत्तरी वस्तुनिष्ठ कोणत्या स्वरूपाचा पाहून व किती गुणांकरीता विचारलेला आहे ते पाहून त्यानुसार परीक्षेतील वेळेची उपलब्ध विभागणी करावी.

३. छात्राध्यापकांने शक्यतो क्रमाने उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करावा. उत्तरे लिहिताना त्या संबंधी प्रश्नपत्रिकेमध्ये विचारलेल्या संपूर्ण प्रश्न लिहिण्यात वेळ न घालविता फक्त संबंधित प्रश्नांचा क्रमांक टाकावा.

४. छात्राध्यापकांने क्रमाने उत्तरे लिहिणे कठीण वाटत असेल तेव्हा सोप्याकडून अवघड कडे या अध्यापन सूत्राचा अवलंब प्रश्न पत्रिकेतील प्रश्न सोडविण्याकरीता करावा.

५. छात्राध्यापकांने उत्तराची कच्ची रूपरेखा तयार करावी. ती करत असताना क्रमाने फक्त मुद्दयाचे शिर्षक लिहून घेवून नंतर त्याच मुद्दयांचा पुन्हा विस्तार करावा असे केल्याने लक्षात येते एखादा मुद्दा राहून गेला असल्यास स्मरण करण्याच्या दृष्टिने सोईचे होते.

६. छात्राध्यापकांने महाविद्यालयामध्ये घेतल्या जाणाऱ्या चाचणीतील निकालाची दखल घ्यावी. ती घेत असताना वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या तुलनेने आपले त्या विषयात मिळालेले गुण व त्या विषयासंदर्भातील ज्ञान कितपत आहे याची जाणीव स्वत:ला करवून द्यावी.

७. छात्राध्यापकांने महाविद्यालयीन कक्षे अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या परीक्षे संदर्भातील निकालावरून कच्चे विषय शोधावेत व कच्चे विषय शोधल्यानंतर त्यामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात मार्गदर्शकाचा सल्ला घ्यावा मित्रांशी चर्चा करावी.

**गृहपाठसंबंधी अभ्याससवयी विषयी छात्राध्यापकांसाठी शिफारसी :**

१. छात्राध्यापकांने रोजच्या रोज गृहपाठ करावेत

२. छात्राध्यापकांने वाचत असताना किंवा वाचून झाल्यानंतर वार, दिनांकानुसार टिपणे उतरवून घ्यावीत ती उतरवून घेत असताना पुस्तकांचे नाव, लेखकाचे नाव, लिहिण्याची सवय लावून घ्यावी व ती टिपणे एकत्रित ठेवावीत व त्याचे वरचेवर / गरजेनुसार वाचन करावे.

३. छात्राध्यापकांने आपण काय वाचले आहे ते फावल्या वेळेत आठवण्याचा प्रयत्न करावा.

४. आपण निश्चित केलेल्या अभ्यासाच्या काही सवयी व्यतिरिक्त आपणाला अन्यत्र एखाद्या छात्राध्यापकांकडे एखादी चांगली सवय आढळून आल्यास तशी सवय लावण्याचा प्रयत्न करावा.

५. आपल्या एखाद्या अभ्यास सवयीचा तोटा परीक्षे अंतर्गत आढळून आल्यास त्यात बदल करण्याचा प्रयत्न करावा.

### ६.४ प्रस्तुत संशोधनाशी संबंधित पुढील संशोधनासाठी क्षेत्रे व विषय :

प्रस्तुत संशोधनाशी संबधित व विस्तृत संशोधन करण्यासाठी पुढील क्षेत्रे किंवा विषय सांगता येतील.

१. प्रस्तुत संशोधन हे वृत्तपत्रे, मासिके व दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमा पुरते मर्यादित आहे. अन्य समूह संपर्क माध्यमे घेवून संशोधनाचा विस्तार वाढवता येईल.

२. प्रस्तुत संशोधन हे फक्त बी. एड. प्रशिक्षणार्थी पुरते मर्यादित आहे. असेच संशोधन हे डी. एड. तसेच माध्यमिक स्तरावरील शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत करता येईल.

३. प्रस्तुत संशोधन हे काही ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरतेच व त्यातील छात्राध्यापकांपुरतेच मर्यादित आहे. त्याचा विस्तार वाढवता येईल.

४. प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करून केलेले आहे अशाच स्वरूपाचे संशोधन हे प्रायोगिक पध्दतीचा अवलंब करून करता येईल.